विषय :- मौजे निळगव्हाण, ता.मालेगांव येथील गट नंबर १३/१, भू.क्र.३४ ते ३९ व १२२ ते १२७ एकुण क्षेत्र १४०४ चौ.मी. यामधील रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणेबाबत.

वाचले :- १) श्री. सिध्दार्थ संजयकुमार मेहता, रा.मालेगांव यांचा अर्ज दिनांक ०४/०१/२०१७
२) म.सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र. बांप/मौजे निळगव्हाण/ता.मालेगांव /गट नंबर १३/१/ससना/५२८ दिनांक २३/०२/२०१७
३) म.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. टिपीपी ४३९७/१८१९/प्र.क्र.२०१/७/नवि-११ दिनांक १०/११/१९९७
४) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण /०२/२०१२/प्र.क्र.४३/ई१ दि.०४/१०/२०१३

उपविभागीय अधिकारी कार्यालय,
क्रमांक/बांप/एसआर/०१/२०१७
मालेगांव,दिनांक०७/०३/२०१७

आदेश :-

श्री. सिध्दार्थ संजयकुमार मेहता, रा. मालेगांव कॅम्प, ता.मालेगांव, जि.नाशिक यांनी **मौजे निळगव्हाण, ता.मालेगांव येथील गट नंबर १३/१, भू.क्र. ३४ ते ३९ व १२२ ते १२७ मधील प्लॉटचे एकुण क्षेत्र १४०४चौ.मी.** प्रस्तावीत बांधकाम **क्षेत्र ८४७.४४ चौ.मी.** या जागेवर **( रो - हाऊसिंग या रहिवास )** रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणेबाबत या कार्यालयास विनंती अर्ज केला आहे.

मौजे निळगव्हाण, ता.मालेगांव येथील गट नंबर १३/१ , भू.क्र. १ ते १४७ (ॲमिनीटी प्लॉट १४८ व १४९) मधील क्षेत्र ३७०००.०० चौ.मी. क्षेत्रास या कार्यालयाकडुन आकृषिक आदेश क्रमांक एनएएसआर/१६५/२००५ दिनांक ०५/०३/२००९ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ बिनशेती परवानगी घेतलेली आहे सदर बिनशेती झालेल्या रेखांकनास या कार्यालयाचा आदेश क्रमांक एनएएसआर/१६५/२००५ दिनांक ३१/१०/२०१५ अन्वये अंतिम मंजुरी देणेत आलेली आहे. गट नंबर १३/१ भू.क्र. ३४ ते ३९ व १२२ ते १२७ एकुण क्षेत्र १४०४ चौ.मी. च्या ७/१२ ला श्री. सिध्दार्थ संजयकुमार मेहता, यांचे नांव दाखल झालेले आहे. या जागेचा वापर ते (रो- हाऊसिंग ) या रहिवास प्रयोजनासाटी करणार आहेत.

मा. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग,नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक बांप/मौजे निळगव्हाण, ता.मालेगांव /गट नंबर १३/१/ससना/५२८ दिनांक २३/०२/२०१७ अन्वये सदर जागेस ( रो- हाऊसिंग ) या रहिवास प्रयोजनार्थ वापर अनुज्ञेय असल्याने बांधकाम नकाशास मंजुरीचे अभिप्राय दिलेले आहे. त्यानुषंगाने मी, उपविभागीय अधिकारी, मालेगांव उपविभाग,मालेगांव खालील अटी व शर्तीवर मौजे निळगव्हाण , ता.मालेगांव येथील गट नंबर १३/१, भू.क्र. ३४ ते ३९ व १२२ ते १२७ मधील प्लॉटचे क्षेत्र १४०४ चौ.मी. यांस मा. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग,नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक बांप/मौजे निळगव्हाण, ता.मालेगांव /गट नंबर १३/१/ससना/५२८ दिनांक २३/०२/२०१७ अन्वये शिफारस केलेले **खालील प्रमाणे बांधकाम क्षेत्रास ( रो- हाऊसिंग ) रहिवास या प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी देत आहे.**

| PLOT NO. | PLOT AREA (SQ.M.) | PROPOSED BUILT - UP AREA (SQ.M.) | PROPOSED CARPET AREA(SQ.M.) |
|---|---|---|---|
| 34 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 35 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 36 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 37 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 38 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 39 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 122 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 123 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 124 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 125 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 126 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| 127 | 117.00 | 70.62 | 59.66 |
| Total | | | |
| 12 | 1404 | 847.44 | 715.92 |

अटी व शर्ती :-

१) मा. सहाय्यक संचालक नगररचना नाशिक यांचेकडील मंजुर नकाशानुसार बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यात काही फेर बदल करावयाचे झाल्यास त्यांचे कार्यालयाची तसेच या कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

२) भुखंडाच्या हद्यीपासुन इमारती पर्यंतची मोजमापे नकाशात दर्शविल्या प्रमाणे असावीत व त्याजागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

३) सांडपाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल याची काळजी घेण्यात यावी.

४) जोपर्यंत बांधकाम झाल्यावर ते मंजुर नकाशाप्रमाणे आहे या बाबत स्थानिक प्राधिकरणाकडुन दाखला घ्यावा.

५) इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर इंजिनिअर/आर्किटेक्ट यांचेकडील पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील. तसेच वापर परवाना मिळालेनंतरच इमारतीचा प्रत्यक्ष वापर सुरु करता येईल.

६) मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग,नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक बांप/मौजे निळगव्हाण,ता.मालेगांव /गट नंबर १३/१/ससना/५२८ दिनांक २३/०२/२०१७ अन्वये चे आराखडयामध्ये त्यांचे पुर्वपरवानगी शिवाय बांधकामात कोणताही बदल करता येणार नाही.

७) प्रमाणित बांधकामास फक्त ( रो - हाऊसिंग) या रहिवास वापर अनुज्ञेय राहील.

८) नगर परिषद संचालनालयाचे परिपत्रक संकीर्ण २००१/प्र.क्र.४१०/२००१/०४ दिनांक २३/०५/२००१ चे अनुपालन करण्यात यावे.

९) सदर बांधकामाच्या सभोवताली मोकळया जागेत नियमाप्रमाणे झाडे लावावी.

१०) सदर क्षेत्राच्या मालकी हक्काबाबत व चतु:सिमाबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

११) विषयांकीत भूखंडावर रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टिम ची प्रभावी पणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

१२) विषयांकीत बांधकाम हे पुररेषेत येत असल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्य समजण्यात येईल.

१३) अर्जदार यांचेकडून सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४३ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना नाशिक यांनी पत्र क्र. पत्र क्रमांक बांप/मौजे निळगव्हाण, ता.मालेगांव /गट नंबर १३/१/ससना/५२८ दिनांक २३/०२/२०१७ अन्वये ( रो - हाऊसिंग ) रहिवास प्रयोजनार्थ विकास शुल्क रु. २१,३४०/-मात्र दिनांक १८/०२/२०१७ रोजी वसूल केलेले आहे.

१४) शासन निर्णय क्र.बीसीडा २००९/प्र.क्र.१०८/कामगार ७-अ दिनांक १७ जुन २०१० चे लगतचे परिशिष्ट १ मधील मार्गदर्शक तत्वे जोडपत्र १ चे परिशिष्ट प्रपत्र १ (नियम ७) प्रमाणे अर्जदाराने एकुण बांधकाम मुल्यांकन १,३५,५९,०४०/- चे आधारे १ % उपकराची रक्कम रु.१,३५,५९१/- रुपये या पैकी ३५,०९१/-रुपये दिनांक ०७/०३/२०१७ रोजी बांधकाम कल्याण कामगार या खाती भरणा केलेली आहे. अर्जदारचे विनंती नुसार पुढील तीन टप्प्यांमध्ये अर्जदारांवर वरील खाती रक्कम जमा करणे बंधणनकारक राहील.

१५) **वर नमुद केलेल्या अटीं व शर्तीचा भंग झाल्यास अगर अर्जदार यांनी दिलेल्या माहितीत असत्यता आढळल्यास सदरचा आदेश हा रद्य समजण्यात येईल.**

उपविभागीय अधिकारी ★ मालेगांव उपविभाग मालेगांव ★

( अजय मोरे )
उपविभागीय अधिकारी
मालेगांव उपविभाग,मालेगांव

प्रति,
श्री. सिध्दार्थ संजयकुमार मेहता, रा. मालेगांव कॅम्प, ता.मालेगांव, जि.नाशिक .

प्रत- १) तहसिलदार,मालेगांव यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
२) तलाठी, निळगव्हाण,ता.मालेगांव यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
२/- मंजुर नकाशापेक्षा जास्त बांधकाम होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी. अन्यथा सर्वस्वी बाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.
३) मा.जिल्हाधिकारी सो, नाशिक (महसुल शाखा) यांचेकडेस माहितीसाठी सादर.
४) मा.सहा. संचालक नगर रचना विभाग, नाशिक यांचेकडी दिनांक २३/०२/२०१७ चे पत्रानुसार माहितीसाठी.

( अजय मोरे )
उपविभागीय अधिकारी